www.pudhari.com
पुढारी
स्थापना १९३९
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

शनिवार, ८ सप्टेंबर २०१८। स्थापना वर्षे ८० । मुंबई आवृत्ती वर्ष १० वे । मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, सोलापूर, बेळगाव, गोवा येथून एकाचवेळी प्रसिद्ध

पाने १६ (१२+४) । किंमत ४.००









# महानिर्मितीला उत्कृष्ट कार्यपद्धती पुरस्कार प्रदान

**नाशिक : प्रतिनिधी**

टाइम्स असेंटद्वारा आयोजित आशिया पॅसेफिक एचआरएम काँग्रेस-२०१८ शिखर परिषदेत महानिर्मितीला दोन आशियास्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कॉर्पोरेट (पीएसयू) संस्थात्मक पातळीवर बेस्ट एचआर प्रॅक्टिसेसकरिता महानिर्मितीला तर वैयक्तिक पातळीवर बेस्ट एचआर प्रोफेशनल पुरस्काराने महानिर्मितीचे कार्यकारी संचालक विनोद बोंदरे यांना गौरविण्यात आले.

पुरस्काराचे मूल्यांकन विशेषत: प्रकल्पग्रस्तविषयक धोरणांची अंमलबजावणी, प्रकल्पबाधित गावांतील तरुण-तरुणींसाठी शिष्यवृत्ती योजना, ऑनलाइन व पारदर्शकतेने भरती प्रक्रियेचा दृष्टिकोन, भरती ते सेवानिवृत्ती एक खिडकी योजना, क्रीडा/नाट्य स्पर्धा, सांघिक सामाजिक जबाबदारी अंतर्गत प्रत्यक्ष उपक्रम इत्यादींवर आधारित आहे. हे दोन पुरस्कार त्याचीच पावती असल्याचे विनोद बोंदरे यांनी सांगितले.

ऊर्जा, कोळसा, पेट्रोलियम, ऑइल, खनिकर्म, टेलीकॉम, बँकिंग, आयटी, वस्त्रोद्योग, फूड, आरोग्य, रियल इस्टेटमधील नामांकित कॉर्पोरेट जगताचा या परिषदेमध्ये सहभाग होता. शिखर परिषदेचे संयोजक डॉ. आर. एल. भाटिया, आयआयएम अहमदाबादच्या माजी डीन डॉ. इंदिरा पारिख, डॉ. न्यूटन व डॉ. लक्ष्मी यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

पुरस्कार वितरण समारंभाप्रसंगी महानिर्मितीचे महाव्यवस्थापक (मासं) आनंद कोंत, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) रणधीर पाठक उपस्थित होते.